# वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर**
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक -- ०२२-२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना / ९८८ /२०२४ दि. २८/०९/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, वागळे** वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. ०३/१०/२०२४ ते दि. १२/१०/२०२४ या कालावधीत **संकल्प चौक** रघूनाथनगर ठाणे या ठिकाणी **'नवरात्रौत्सव'** निमित्त **'रासरंग गरबा'** चे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाकरीता अति महत्वाच्या व्यक्ती मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मॉडेला चौकातून रहेजा कट मार्गे संकल्प चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **रहेजा कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. ( रहेजा कॉम्प्लेक्स/ गार्डन मधील रहिवासी यांची वाहने वगळून )

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने तीन हात नाका मार्गे डावीकडे वळून रघूनाथनगर किंवा एल.आय.सी कट येथून डावीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) हाजूरी चौक कडून संकल्प चौकातून रहेजा कॉम्प्लेक्स कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **ऑडी शोरूम हाजूरी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ऑडी शोरूम हाजूरी येथून डावीकडे वळून गुरूकुल स्कूल येथून डावीकडे वळून रघूनाथनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) जूना पासपोर्ट ऑफीस कडून संकल्प चौककडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **जिलानेवाडी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने जिलानीवाडी येथून डावीकडे वळून संजय गांधी चौक हाजूरी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) साईमास हॉटेल रघूनाथ नगर कडून संकल्प चौकातून जूना पासपोर्ट ऑफिसकडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **गुरूकुल स्कुल गेट समोर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने गुरूकुल स्कुल गेट समोरून उजवीकडे वळून ऑडी शोरूम हाजुरी येथून उजवीकडे वळून इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. ०३/१०/२०२४ ते दि. १२/१०/२०२४ रोजी १७.०० वा. ते रात्रौ २४.०० वाजेपावेता अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

जिल्हाधिकारी, ठाणे
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

**<u>प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,</u>**

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि वागळे, कापूरबावडी, राबोडी, नौपाडा, वाहतूक उपविभाग.

CamScanner



Caravan Menu
संजय गांधी चौक
SG-Barve-Rd
पासपोर्ट
हाजूरी
LOUIS WADI
लुइस वाडी
ऑडी
जिलानीवाडी
संकल्प चौक
SG-Barve-Rd
RAHEJA
GARDENS
रहेजा
गार्डन्स
रहेजा कट
तीन हात नाका
Hotel-Tip-Top-Plaza


CamScanner


LIC
MSEB ऑफिस
पासपोर्ट ऑफिस
आर.टी.ओ. ऑफिस
संकल्प चौक
बँक
शिवाजीनगर
पेट्रोलपंप
पोस्ट ऑ.
लाल बहादूर शास्त्री मार्ग